मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
www.rajdand.com
। पश्चिम महाराष्ट्र ।
follow us : /rajdandlive
RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २९३ सातारा * बुधवार दि १० जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# रशियाकडून सर्वोच्च पुरस्काराने सन्मान

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : सन्मान फक्त माझा नाही तर हा १४० कोटी भारतीयांचा





**मॉस्को :** :पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या रशिया दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यावेळी पंतप्रधान मोदी यांना रशियातील सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'ऑर्डर ऑफ सेंट अँड्रयू द अपॉस्टल' असे या पुरस्काराचे नाव असून हा रशियातील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी या पुरस्काराने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सन्मान केला आहे.

यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, रशियाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने मला सन्मानित केल्याबद्दल रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन याचे आभार मानतो. तसेच हा पुरस्कार मी भारतीयांना समर्पित करतो. हा सन्मान फक्त माझा नाही तर हा १४० कोटी भारतीयांचा सन्मान आहे. भारत आणि रशिया यांच्यातील शतकानुशतके मैत्रीचा आणि परस्पर विश्वासाचा हा सन्मान आहे. प्रत्येक वेळी नवीन उंची गाठली आहे. यामुळे आपले परस्पर सहकार्य अधिक मजबूत होत आहेत, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं.

दरम्यान, या दौऱ्यावेळी पंतप्रधान मोदी यांनी आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेत त्यांनी विविध मुद्दे उपस्थित केले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी यावेळी शांतीचा संदेश दिला. ते म्हणाले की, युद्धाच्या मैदानात अडचणींवरील उपाय सापडत नाहीत. कोणत्याही प्रकारचे प्रश्न सुटत नाहीत. शांततेसाठी चर्चेची खूप जास्त गरज असते. भारत हा नेहमीच शांततेच्या बाजूने उभा राहिला आहे. कारण युद्ध हा अडचणींवरील उपाय नाही. मला शांततेची अपेक्षा आहे. मी शांततेसाठी सर्व प्रकारची मदत करण्यास तयार आहे.

**भारतीयांशी संवाद साधताना मोदी काय म्हणाले?**

द्विपक्षीय चर्चेआधी मोदींनी मॉस्को येथील एका कार्यक्रमात तेथील भारतीयांशी संवाद साधला. ते म्हणाले, मी इथे येताना एकटा आलेलो नाही. मी माझ्याबरोबर काही गोष्टी घेऊन आलोय. मी माझ्याबरोबर भारतातल्या मातीचा गंध घेऊन आलोय, तुमच्यासाठी १४० कोटी भारतीयांचं प्रेम घेऊन आलोय. तिसऱ्यांदा पंतप्रधान बनल्यानंतर हा माझा परदेशातील भारतीय समुदायाशी पहिलाच संवाद आहे. हा खूप आंनददायी क्षण आहे. आज ९ जुलै असून मला तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेऊन आज बरोबर एक महिना झाला आहे. मी आज तुम्हा सर्वांसमोर ठामपणे सांगेन की, माझ्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळात मी तिप्पट ताकद लावून काम करेन. आधीपेक्षा तिप्पट वेगाने काम करेन. देशाचा विकास वेगाने करण्याची मी शपथ घेतली आहे.


## गौतम गंभीरची भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड



**मुंबई :** भारतीय क्रिकेट संघाने नुकतीच टी-२० विश्वचषकात विजय मिळविल्यानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी आपली निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर बीसीसीआय मुख्य प्रशिक्षकपदाच्या शोधात होती. भारताचा माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर या पदासाठी इच्छुक होता. त्यासाठी त्याने मुलाखतही दिली होती. आता बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी गौतम गंभीरची मुख्य प्रशिक्षकपदी निवड झाल्याचे जाहीर केले आहे. गौतम गंभीरचा कार्यकाळ जुलै २०२४ पासून सुरू होत आहे. तो डिसेंबर २०२७ पर्यंत या पदावर राहिल. कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांकरिता प्रशिक्षकपदाची जबाबदारी त्याच्यावर राहणार आहे.

जय शाह यांनी एक्सवर पोस्ट करत ही बातमी दिली आहे. त्यात ते म्हणाले, भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षकपदासाठी माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर यांचे नाव जाहीर करताना मला आत्यंतिक आनंद होत आहे. आधुनिक काळातील क्रिकेट झपाट्याने बदलले आहे आणि गौतम या बदलांचा साक्षीदार राहिला आहे. गौतमने त्याच्या कारकिर्दीत अनेक भूमिका वठविल्या आहेत. त्याने आजवर केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तो यापुढे भारतीय संघालाही पुढे नेईल. तसेच हे करण्यासाठी तो आदर्श व्यक्ती वाटतो. गौतम गंभीरची दूरदृष्टी आणि त्याचा अफाट अनुभव त्याला मुख्य प्रशिक्षकपदासाठी योग्य दावेदार ठरवतो. बीसीसीआयकडून गौतम गंभीरच्या या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा, अशा शब्दांत जय शाह यांनी गौतम गंभीरचे स्वागत केले.

## सागरी किनारा मार्गावरील हाजी अली - वरळी टप्पा लवकरच सुरू होणार, वांद्रे - वरळी सागरी सेतूसाठी अद्याप प्रतीक्षा



**मुंबई :** धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पातील हाजी अली - वरळीदरम्यानचा साडेतीन किमी लांबीचा टप्पा येत्या एक - दोन दिवसांत वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता आहे. या टप्प्यातील कामे पूर्ण होत आली असून मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी या कामाची मंगळवारी पाहणी केली. पावसाने उसंत घेतल्यास उर्वरित कामे पूर्ण करून एक - दोन दिवसांत हाजीअली - वरळीदरम्यानचा टप्पा सुरू करण्यात येणार आहे.

धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण करण्यात येत असून टप्प्याटप्प्याने या प्रकल्पाच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात येत आहेत. यापूर्वी हाजीअली - मरिन ड्राईव्हदरम्यानची मार्गिका सुरू करण्यात आली होती. त्यानंतर मरिन ड्राईव्ह - हाजीअलीदरम्यानची मार्गिका सुरू करण्यात आली. आता या प्रकल्पातील उत्तर मुंबईकडे जाणारी हाजीअली - वरळीदरम्यानची मार्गिका लवकरच सुरू होणार आहे. उत्तर वाहिनीमार्गावर हाजीअलीपासून खान अब्दुल गफार खान मार्गे राजीव गांधी सागरी सेतू दरम्यानची सुमारे साडेतीन किलोमीटर उत्तर दिशेच्या मार्गिकेची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. या कामांची पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी पाहणी केली. यावेळी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, प्रमुख अभियंता (मुंबई किनारी रस्ता प्रकल्प) गिरीश निकम, उपप्रमुख अभियंता मांतय्या स्वामी यांच्यासह अभियंते, अधिकारी, सल्लागार व कंत्राटदार उपस्थित होते. या साडेतीन किमीच्या टप्प्यातील काही कामे शिल्लक असून ती एक दिवसात पूर्ण होतील. मात्र पावसाने उसंत घेतल्यास ती कामे होऊ शकतील. त्यामुळे येत्या एक - दोन दिवसांत उत्तर मार्गिकेचा साडेतीन किमीचा टप्पा खुला होईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

वांद्रे - वरळी सागरी सेतूसाठी प्रतीक्षा

सागरी किनारा रस्ता पुढे वांद्रे - वरळी सागरी सेतूला जोडण्यात येणार आहे. हा प्रकल्प वांद्रे - वरळी सागरी सेतूला जोडण्यासाठी दोन तुळई (बो स्ट्रींग आर्च स्ट्रिंग गर्डर) यशस्वीपणे स्थापन केल्यानंतर दोन्ही मार्गिकांच्या कामांना वेग देण्यात आला आहे. मात्र सागरी किनारा मार्ग आणि वांद्रे वरळी सागरी सेतूला जोडणाऱ्या पुलाची कामे अद्याप बाकी असल्यामुळे वाहनचालकांना अजून प्रतीक्षा करावी लागणार आहे. प्रकल्पातील आंतरमार्गिका, रस्ते, सागरी पदपथ आदी कामे अंतिम टप्प्यात आहेत.

वाहतूक कोंडी कमी होणार

## शिवसेनेत कुठली जबाबदारी? वसंत मोरे म्हणाले, उद्धव ठाकरे मला.....



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या आधी राज ठाकरेंच्या फोटोसमोर दंडवत घालून पक्षाला जय महाराष्ट्र करणारे वसंत मोरे हे वंचित बहुजन आघाडीत गेले. मात्र अवघ्या तीन महिन्यांत त्यांनी हा पक्ष सोडला. वसंत मोरे आता उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश करत आहेत. मी माझ्या पूर्वीच्याच पक्षात जात आहे असं त्यांनी म्हटलं होतं. हातावर शिवबंधन बांधण्यापूर्वी त्यांनी प्रतिक्रिया दिली. कुठली जबाबदारी असेल त्यावरही भाष्य केलं.

**वसंत मोरेंकडून मनसेला खिंडार**

वसंत मोरेंनी शिवसेनेत जाण्यापूर्वी मनसेला खिंडार पाडलं आहे. कारण त्यांच्यासह मनसेचे १७ शाखाध्यक्ष, पाच उपविभाग अध्यक्ष, एक शहाराध्यक्ष आणि इतर अनेक पदाधिकारी तसंच वाहतूक सेनेचे पदाधिकारी ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. त्यामुळे शिवसेनेत जाताना वसंत मोरेंनी मनसेला खिंडार पाडल्याची चर्चा आहे. वसंत मोरे म्हणाले, यापैकी मी कुणालाही सक्ती केलेली नाही. पहिल्या दिवसापासून प्रत्येकाला सांगतो आहे की ज्यांना पक्षा राहायचं आहे ते राहू शकतात. मात्र जे काही राजकारण सुरु होतं ते लोकांनी पाहिलं आहे. मी कुणालाही जबरदस्ती केलेली नाही, सक्ती केलेली नाही. सगळे आपल्या मर्जीने उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश करत आहेत.


**वंचितला लोकसभा निवडणुकीला महिना पूर्ण झाल्यानंतर रामराम**

वसंत मोरेंनी काही दिवसांपूर्वीच वंचित बहुजन आघाडीला रामराम केला. त्याआधी त्यांनी मनसेला रामराम केला होता. आता ते शिवसेनेत असणार आहेत. वसंत मोरेंनी प्रकाश आंबेडकर यांना मेसेज केला, तसंच त्यांची भेटही घेतली. त्यांना आपण सॉरी म्हणालो आहोत असंही वसंत मोरेंनी सांगितलं. वसंत मोरेंनी पुणे लोकसभा निवडणूक वंचित बहुजन आघाडीच्या तिकिटावर लढवली होती. मात्र या निवडणुकीत त्यांचं डिपॉझिट जप्त झालं. त्यांच्या बंडाची खूप चर्चा सोशल मीडियावर झाली होती. आता शिवसेनेत काय भूमिका असेल याबाबतही वसंत मोरेंनी भाष्य केलं आहे.

**शिवसेनेत कुठली जबाबदारी असणार?**

शिवसेनेत कुठली जबाबदारी असणार? हे विचारलं असता, वसंत मोरे म्हणाले, मला कुठलाही शब्द देण्यात आलेला नाही. मी कोणताही शब्द उद्धव ठाकरेंकडून घेतलेला नाही. उद्धव ठाकरे, संजय राऊत, आदित्य ठाकरे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे पक्षात जात आहे. जी जबाबदारी मला पक्ष देईल ती जबाबदारी मी नक्कीच पूर्ण करेन असं वसंत मोरेंनी म्हटलं आहे. टीव्ही ९ मराठीशी त्यांनी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. आता उद्धव ठाकरे त्यांना कुठली जबाबदारी देतात? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

## कोयना धरणात 'इतका' TMC पाणीसाठा



**पाटण :** जिल्ह्याच्या पश्चिम भागात पाऊस वाढत असून हवामान विभागाने आज दि. ९ जुलै रोजीपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार (रेड अलर्ट) पर्जन्यमान होण्याची शक्यता वर्तविलेली आहे. दरम्यान, कोयना पाणलोट क्षेत्रात पाऊस पडत असून मंगळवारी सकाळी आठ वाजेपर्यंत आलेल्या आकडेवारीनुसार कोयना धरणात ३१.६७ टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे. तर ३०.०९ टक्के धरण भरले आहे.

एक जूनपासून आतापर्यंत १ हजार ६७० मिलीमीटर पाऊस झालेला आहे. कोयना येथे आतापर्यंत १ हजार ५३८ मिलीमीटर पाऊस पडला. तर महाबळेशरलाही एकूण १ हजार २९९ मिलीमीटर पर्जन्यमानाची नोंद झालेली आहे. या पावसामुळे कोयना धरणात सकाळच्या सुमारास १३ हजार ५९३ क्यूसेक वेगाने पाणी येत आहे.

जिल्ह्यात यावर्षी पाऊस वेळेत सुरू झाला. तसेच गेल्यावर्षीच्या तुलनेत आतापर्यंत चांगले पर्जन्यमान झाले आहे. १ जूनपासून ९ जुलैपर्यंत कोयनेला एकूण १५५४, नवजा येथे १६९१ आणि महाबळेश्वरला १ हजार ३२६ मिलीमीटर पाऊस झालेला आहे.

## पवारांना शह देण्यासाठी अजितदादा लागले कामाला

### विधानसभेसाठी केलं 'मास्टर' प्लॅनिंग




**मुंबई :** लोकसभा निवडणुकीमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीची झालेली पिछेहाट आणि शरद पवारांच्या वाढलेला पक्षाचा स्ट्राईक रेट पाहता अजित पवारांच्या आमदारांमध्ये नाराजीचं वातावरण आहे. त्यामुळे आगामी विधानसभेमध्ये ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि पवारांना शह देण्यासाठी अजितदादा कामाला लागले आहेत. यासाठी त्यांनी आज (९ जुलै) ला मुंबईमध्ये श्री सिध्दीविनायकाच्या दर्शनाने राष्ट्रवादी काँग्रेसने विधानसभा प्रचाराचा नारळ फोडला.

महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस अधिक मजबूत करण्यासाठी येत्या काही दिवसांत आम्ही महाराष्ट्रात प्रचाराचे झंझावाती दौरे सुरु करणार आहोत. त्याची सुरुवात म्हणून आज माझ्या सर्व मंत्री आमदार आणि पदाधिकाऱ्यांसमवेत श्री सिध्दीविनायकाचे दर्शन घेतल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

या अगोदर सोमवारी पक्षाच्या बैठकीत निर्णय झाली त्यानंतर आज सकाळी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे खासदार, आमदार, मंत्री व पदाधिकारी पक्ष कार्यालयात एकत्र जमून बसने श्री सिध्दीविनायकाच्या दर्शनाला दाखल झाले. त्यावेळी अजित पवार म्हणाले की, आम्ही जनतेसमोर त्यांचे आशिर्वाद मागण्यासाठी जात आहोत. सिध्दीविनायकाने आम्हाला आशिर्वाद द्यावेत त्यासाठी विजयाची खूण दाखवली आहे.

शेवटी जनता - जनार्दन सर्वकाही असते. लोकांचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी त्यांच्यासमोर जाणार आहोत. चांगल्या कामाची सुरुवात ही गणरायाच्या दर्शनाने केली जाते आणि आज अंगारकी असल्याने माझ्या पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी यांना घेऊन दर्शनाला आलो आहे. १४ जुलै रोजी बारामतीमध्ये आमची जाहीर सभा होत असल्याने त्याची सुरुवात आज केल्याचे अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

## राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी, मुख्यमंत्री शिंदेंची महाविकास आघाडीवर टीका



**मुंबई :** राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी आज राज्य सरकारच्यावतीने सर्वपक्षीय बैठक मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह या ठिकाणी बोलावली होती. मात्र, या बैठकीवर महाविकास आघाडीने बहिष्कार टाकला. आरक्षणाच्या मुद्यांवर विधानसभेत चर्चा व्हावी, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली होती. पण ही मागणी सरकारकडून मान्य करण्यात आली नाही. त्यामुळे या बैठकीवर विरोधकांनी बहिष्कार टाकला.

आता सर्वपक्षीय बैठक पार पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. राज्यात जातीय तेढ रहावा अशी भूमिका महाविकास आघाडीची असून दोन समाजात तेढ निर्माण व्हावा, आणि आपली राजकीय पोळी भाजून घ्यावी, हा विरोधकांचा प्रयत्न आहे. मात्र, विरोधक जेव्हा सत्तेत होते तेव्हा मराठ्यांना आरक्षणापासून वंचित ठेवलं, असा हल्लाबोल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

मुख्यमंत्री शिंदे काय म्हणाले?

राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून जे काही वातावरण तयार झालं आहे. महाराष्ट्र असाच पेटता राहावा, अशा प्रकारचं धोरण महाविकास आघाडीचं आहे. हे आजच्या सर्वपक्षीय बैठकीवर महाविकास आघाडीने टाकलेल्या बहिष्कारामधून दिसून आलं आहे. राज्यात कधी अशा पद्धतीच्या घटना घडल्या तर सरकार आणि विरोधी पक्ष तसेच सर्व पक्षांचे नेते एकत्र येऊन चर्चा करून मार्ग काढत असतात.

दोन्हीही समाजाला न्याय मिळाला पाहिजे. यावरच आजच्या बैठकीत चर्चा झाली. मात्र, या दोन्ही समाजात संघर्ष कायम राहावा आणि आपली राजकीय पोळी भाजून घ्यावी, ही महाविकास आघाडीची भूमिका महाराष्ट्रासमोर आली आहे, अशी टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

## राज्यात पुढील चार दिवस पावसाचा जोर कमी राहणार

**पुणे :** राज्यात पुढील चार दिवस पावसाचा जोर कमी राहणार आहे. किनारपट्टीसह पश्चिम घाटाच्या परिसरातही जोर कमी राहण्याचा अंदाज आहे. राज्याच्या उर्वरित भागात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पुढील चार दिवस पावसाचा जोर काहीसा कमी राहण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने बुधवारसाठी (१० जुलै) किनारपट्टीवरील जिल्ह्यांसह पुणे, सातारा, विदर्भ आणि विदर्भाला जोडून असलेल्या मराठवाड्याला पिवळा इशारा दिला आहे. प्रामुख्याने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी म्हणाले, सध्या अरबी समुद्रातील मोसमी पावसाची शाखा सक्रिय आहे. अरबी समुद्रातून बाष्पयुक्त हवा वेगाने किनारपट्टीकडे येत आहे. त्यामुळे किनारपट्टी आणि घाट परिसरात पावसाचा जोर राहील. पण, उर्वरित राज्यात पावसाचा जोर कमी होईल. गुरुवारपर्यंत (११ जुलै) पावसाचा जोर कमी राहील. त्यानंतर पावसाचा जोर हळूहळू वाढण्याचा अंदाज आहे.

राज्यात पावसाचा जोर काहीसा कमी झाला आहे. रविवार, सोमवारच्या तुलनेत किनारपट्टी आणि घाटमाथ्यावरही पावसाचा जोर कमी आहे. शुक्रवारनंतर (१२ जुलै) पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. मागील आठवडाभर गुजरातपासून केरळच्या किनारपट्टीवर असलेला कमी दाबाचा पट्टा अरबी समुद्रात आत गेल्यामुळे पावसाचा जोर कमी झाला आहे.

# ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुलभ करा-आमदार ऋतुराज पाटील यांची मागणी

**कोल्हापूर -** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुलभ करा, अशी मागणी आमदार ऋतुराज पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केलीय. याबाबतचं निवेदन निवासी जिल्हाधिकारी संजय तेली यांना देण्यात आलं.

महाराष्ट्र शासनानं पावसाळी अधिवेशनामध्ये राज्यातील महिलांसाठी 'मुख्यमंत्री लाडकी बहिण' ही योजना जाहीर केली. या योजनेसाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरु केलीय. परंतू ऑनलाईन नोंदणी करताना अनेक अडचणी येतायत. त्यामुळं यातील तांत्रिक अडचणी दूर करून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुलभ करावी अशी मागणी आमदार ऋतुराज पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडं केलीय. याबाबतच निवेदन आमदार ऋतुराज पाटील यांनी आज मंगळवारी निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांना दिलं. या योजनेची कागदपत्रे किंवा फोटो अपलोड करताना पाच एमबी पर्यंत साईज आवश्यक करण्यात आली असून ती वाढवणे आवश्यक आहे. लाभार्थींचा प्रत्यक्ष फोटो ऐवजी हार्डकॉपी फोटो अपलोड करण्याची सुविधा द्यावी.



सध्या नारीशक्ती दूत या पवर एकाच वेळी हजारों लोक नोंदणी करत असल्यानं फॉर्म भरण्याचा वेग खूप कमी आहे. अगदी पहाटे किंवा मध्यरात्रीही साधारणपणे एक फॉर्म भरण्यास २५ ते ३० मिनीटांचा कालावधी लागतो. हा वेळ कमी होण्यासाठी उपाय योजना करावी. बऱ्याच ठिकाणी पहाटे फॉर्म भरले जात असल्यानं भल्या पहाटे फॉर्म भरण्यासाठी सेतू सुविधा केंद्रावर महिलांच्या रांगा लागतायत. महिला भगिनींना होणारा हा त्रास कमी करण्यासाठी 'नारीशक्ती दूत' प बरोबरच कॉम्प्युटरच्या मदतीनं फॉर्म भरता येईल ,अशी सुविधा देण्यात यावी अशी मागणी आमदार ऋतुराज पाटील यांनी निवेदनात केलीय. तसंच या योजनेचे फॉर्म भरण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविका, मदतनीस, सेतू सुविधा केंद्र, ग्रामपंचायत यांच्याकडं आहे. मात्र, या सर्वांना ऑनलाईन फॉर्म भरण्याबाबत पुरेशी तांत्रिक माहिती नसल्यानं त्यांना याबाबतच प्रशिक्षण देण्यात यावं. या योजनेसाठी आवश्यक तांत्रिक बाबीमध्ये योग्य सुधारणा होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, अशी मागणीही या निवेदनाद्वारे करण्यात आलीय.

आमदार ऋतुराज पाटील यांनी याबाबत या योजनेचे नोडल अधिकारी सुहास वाईंगडे यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. शासनाची ही योजना जास्तीत जास्त लाभार्थी महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी आमचे कार्यकर्ते प्रयत्न करतायत. प्रशासनानं यासाठी सहकार्य करावं, असंही आमदार ऋतुराज पाटील यांनी सांगितलं.

# चंद्राबाबू आणि नितेश कुमार यांना हवा ५० हजार कोटीचा निधी

**नवी दिल्ली :** देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा स्थापन झालेल्या सरकारला बहुमतासाठी टेकू देणाऱ्या संयुक्त जनता दल आणि तेलगू देशम या पक्षांचे नेते नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांनी केंद्र सरकारकडे ५० हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. देशाचा अर्थसंकल्प २३ जुलै रोजी संसदेत सादर केला जाणार आहे. त्यापूर्वी या नेत्यांनी आपली मागणी केंद्रापर्यंत पोहोचविली आहे

'अब की बार चारसो पार,'चा नारा देणाऱ्या भारतीय जनता पक्षाला लोकसभा निवडणुकीत अपेक्षित कामगिरी करता आली नाही. त्यामुळे सलग तिसऱ्यांदा सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजपला संयुक्त जनता दल आणि तेलगु देशमची मदत घ्यावी लागली. या मदतीचा मोबदला राज्यांना निधीच्या स्वरूपात हे दोन्ही पक्ष पुरेपूर वसूल करणार हे निश्चित आहे.

तेलंगणाला प्रामुख्याने आपली नवी राजधानी अमरावती बसविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे सिंचन प्रकल्पांसाठी देखील निधीची आवश्यकता असल्याचे तेलंगणा सरकारने केंद्राला सांगितले आहे. बिहार सरकारला राज्यात नवे ९ विमानतळ, दोन नद्यांवर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी आणि सात नवी वैद्यकीय महाविद्यालय यासाठी मोठा निधी हवा आहे.

# केडीसीसी बँकेत मुख्यमंत्री- लाडकी बहीण योजनेची खाती झिरो बॅलन्सवर

**जिल्हा बँकेची अभिनव योजना**

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मुख्यमंत्री-लाडकी बहीण योजनेसाठी झिरो बॅलन्सवर खाती उघडून घेण्यास सुरुवात केली आहे. खास या योजनेसाठी माता-भगिनींसाठी ही अभिनव योजना राबविण्याचा निर्णय बँकेने घेतल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी . जी. एम. शिंदे यांनी दिली. महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा; कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री आणि बँकेचे अध्यक्ष नामदार हसनसाहेब मुश्रीफ यांच्या मार्गदर्शनाखाली ही अभिनव योजना सुरू केल्याचेही त्यांनी सांगितले. झिरो बॅलन्स सुविधेची राज्यातील पहिली बँक आहे.

याबाबत बँकेने प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, महाराष्ट्र राज्य सरकारच्या मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने बँकेत नवीन खाते केवळ शून्य बाकीवर उघडण्याची अभिनव योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. घोषित योजनेचा लाभ मिळण्यासाठी नवीन खाते उघडण्याची सुविधा बँकेत उपलब्ध करून देण्यात येत आहे. बँक शासनाच्या विविध योजनांची उदाहरणार्थ: संजय गांधी, इंदिरा गांधी, श्रावणबाळ योजना, स्कालरशीप, अंगणवाडी महिला या सारख्या योजनेचे अनुदानाचे वाटप करीत आहे. तसेच; लेक लाडकी योजनाही बँकेने प्रभावीपणे राबवली असून त्यास वांगला प्रतिसाद मिळाला आहे. तरी मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीणं योजनेची रक्कम जमा होण्यासाठी जिल्हा बँकेतील कोणत्याही शाखेत सध्या चालू असलेल्या बचत ठेव खात्यामध्ये देखील सरकारच्या योजनेतील रक्कम जमा करून लाभ घेता येईल. या खातेदारांना प्रधानमंत्री जीवन ज्योती आणि जीवन सुरक्षा विमा योजनेचा लाभ मिळेल.

# मराठवाड्यात भाजपला धक्क्यावर धक्के!

## आता नाराज माजी गृहराज्यमंत्र्यांनी दिला राजीनामा

**मुंबई :** राज्यात महायुतीमुळे भाजप या पक्षातील नेते आणि कार्यकर्ते नाराज असल्याचं वारंवार समोर येत आहे. यामध्ये मराठवाड्यामध्ये भाजपला तिसरा मोठा धक्का बसला आहे. एकीकडे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण जरी भाजपमध्ये आले असले तरी त्याच नाराजीतून पक्षाचे नेते आणि माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधव किन्हाळकर यांनी पक्ष सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला आहे.

**मराठवाड्यात भाजपला धक्क्यावर धक्के!**

तर भाजपला मराठवाड्यात धक्क्यावर धक्के बसत आहेत. कारण याअगोदर देखील किन्हाळकरांच्याच नांदेडमधील भाजपनेते सुर्यकांता पाटील यांनी भाजपला रामराम करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. तर दोनच दिवसापूर्वी छत्रपती संभाजीनगरमध्ये माजी महापौर आणि भाजप नेते राजू शिंदे यांनी अनेक कार्यकर्त्यांसह भाजपला सोडत ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यानंतर आता नांदेडमध्येच माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधव किन्हाळकर यांनी पक्ष सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला आहे. किन्हाळकर यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे हा राजीनामा सुपूर्द केला आहे.

महायुतीमध्ये एकत्र असलेल्या शिवसेना राष्ट्रवादी आणि भाजप या पक्षांतील स्थानिक नेते आणि कार्यकर्ते नेहमी एकमेकांच्या विरोधात होते. मात्र अचानक एकत्र आल्याने कार्यकर्ते नाराज आहेत. त्यातून भाजपमधील नेते पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचं सत्र सुरू झालं आहे. त्यामुळे भाजप ही गळती कशी थांबवणार? आगामी विधानसभा निवडणुकीसाठी ही गळती थांबवणं अत्यंत महत्त्वाचं असून त्यासाठी भापची नेमकी रणनीती काय असणार आहे? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपचे नेते खबडून जागे झाले. आगामी विधानसभा निवडणुकीचा विचार करुन एकापाठोपाठ एक 'माधव' नेत्यांचे पुनर्वसन करण्याची मोहीमच भाजपच्या नेत्यांनी हाती घेतली आहे. त्यात आता यात पंकजा मुंडे आणि भाजपच्या ओबीसी विभागाचे माजी प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर यांना विधान परिषदेवर संधी दिली. पंकजा मुंडे यांचे मंत्रिपदासाठीही नाव चर्चेत आहे. तर महादेव जानकर यांना राज्यसभेचे आश्वासन दिले. त्यानंतर आता राम शिंदे यांनाही बड्या पदावर बसवण्याची तयारी भाजपने सुरु केली आहे.

# रवींद्र धंगेकर पुन्हा चर्चेत, मतदारसंघात 'लाडकी बहीण' योजनेचा बोर्ड मात्र मुख्यमंत्र्यांचे फोटो गायब

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकांपूर्वी राज्य सरकारने मोठा निर्णय घेत महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्याची घोषणा केली आहे. या योजनेतंर्गत राज्यातील अल्प उत्पन्न गटातील २१ ते ६५ वयोगटाच्या महिलांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळणार आहे. या योजनेतंर्गत महिलांना राज्य सरकार दरमहिन्याला १५०० रुपये देणार आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी संपूर्ण राज्यात महिला उत्सुक दिसत आहे.





तर दुसरीकडे या योजनेची क्रेझ पाहता आता विरोधकांकडून देखील आपल्या मतदारसंघात या योजनेबद्दल माहिती देणारे बोर्ड लावण्यात येत आहे. असाच एक बोर्ड सध्या पुण्यातील कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात देखील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्याकडून लावण्यात आला आहे. मात्र सध्या या बोर्डवरून राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण आले आहे.

धंगेकर यांच्याकडून लावण्यात आलेल्या या बोर्डवर योजनेसंबंधी सर्व माहिती देण्यात आली आहे. मात्र या बोर्डवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा महायुती सरकारचा उल्लेख करण्यात आलेला नाही. या बोर्डवर धंगेकर यांनी स्वतः चा आणि त्यांच्या पत्नीचा फोटो लावला आहे तर बोर्डच्या वरच्या बाजूला सोनिया गांधी, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांचा फोटो लावण्यात आला आहे. त्यामुळे आता या बोर्डवरून पुन्हा एकदा महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये आरोप प्रत्यारोप होताना दिसत आहे.

आमदार धंगेकरांनी तसेच सरकारच्याच योजनेचा बोर्ड लावल्याने मोठी चर्चा होत आहे. तर दुसरीकडे आमदार रवींद्र धंगेकर यांच्याकडून या बोर्डवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुती सरकारचा उल्लेख का? करण्यात आला नाही. याबाबत रवींद्र धंगेकर यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ सर्वांना मिळणार नाही. संजय गांधी निराधार योजना किंवा इतर योजनांतर्गत १,५०० रुपयांपेक्षा जास्त अनुदान ज्या महिलाना मिळत आहे त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. अशी माहिती सरकारकडून देण्यात आलेली आहे.

योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

या योजनेत अर्ज करणारी महिला महाराष्ट्राची रहिवाशी असणे आवश्यक आहे. त्यांच्याकडे रहिवाशी प्रमाणपत्र किंवा जन्म दाखल असणे आवश्यक आहे. मात्र ज्या महिलांकडे रहिवाशी प्रमाणपत्र नसेल त्यांच्याकडे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा जन्म दाखला असणे आवश्यक आहे. याच बरोबर जर दुसऱ्या राज्यातील महिलेने महाराष्ट्राचा रहिवाशी असलेल्या पुरुषासोबत विवाह केला असेल तर तिच्याकडे पतीचा जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा रहिवाशी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तेव्हाच या योजनेत अर्ज करता येणार आहे.

# मुख्याधिकारी एन. के. पाटील असभ्यपणाचे अशोभनीय वर्तन केल्याबाबत निलंबित

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी दि.१/६/२०२४ रोजी मद्यधुंद अवस्थेत कारने अपघात केला तसेच कार्यालयातील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत आक्षेपार्ह असभ्यपणाचे अशोभनीय वर्तन केल्या बाबत सोमवारी (दि.८) निलंबित केले असून उप सचिव अनिरुद्ध जेवळीकर यांनी आदेश दिला आहे.

आदेशात मुख्याधिकारी एन के पाटील यांच्याविरुध्द दि.१/६/२०२४ रोजी स्कॉर्पिओ क्रमांक एमएच १३ ई सी ९६३३ वाहन मानवी जिवितास धोका होईल अशा प्रकारे भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या २ कारला धडक दिली व अपघात करुन पळून गेल्याप्रकरणी तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन मध्ये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७८, ३३६, ४२७ सह मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४, १८५, १३४ नुसार गु.र.क्र. ०३०९/२०२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दाखल गुन्ह्यानुसार एन के पाटील यांच्या रक्ताचे नमूने न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, गणेशखिंड, पुणे यांनी तपासले असता, त्यांच्या दि.०६/०६/२०२४ रोजीच्या अहवालामध्ये ढ्हश लश्रेव लेपींरळपशव ०.०४४ सी (Forty Four mgs.) Percent. w/v of Ethyl Alcohol असे नमुद केले आहे. तसेच, मुख्याधिकारी एन के पाटील यांचे महिला अधिकारी व कर्मचारी यांचेशी असलेले वर्तन आक्षेपार्ह, असभ्यपणाचे व अशोभनीय असल्याचे जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दि.२७/०३/२०२४ व सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या दि.३०/०३/२०२४ रोजीच्या अहवालात नमुद केलेले आहे.

मुख्याधिकारी एन के पाटील यांच्या विरुद्ध दाखल प्रथम खबर अहवालातील (FIR) गांभिर्य पाहता तसेच पाटील यांचे नगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यासोबत अर्वाच्य भाषेत बोलणे व असभ्य वर्तन करणे या बाची विचारात घेता, पाटील यांच्या वर्तणूकीमुळे शासनाची प्रतिमा मलीन झाली आहे. त्यांच्या या वर्तणूकीमुळे त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ चा भंग केला आहे.

मुख्याधिकारी पाटील यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४, पोटकलम (१) (अ) च्या तरतूदीनुसार आदेशाच्या दिनांकापासून निलंबित झाल्याचे मानण्यात आले आहे आणि ते पुढील आदेश काढले जाईपर्यंत निलंबित राहतील. आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात असेल तेवढ्या कालावधीत मुख्याधिकारी पाटील यांचे मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे राहील, पाटील यांना शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

निलंबन आदेश अस्तित्वात राहतील त्या कालावधीसाठी मुख्याधिकारी पाटील यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम ६८ व ६९ अन्वये निर्वाह भत्ता व त्यावरील भत्ते जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयामार्फत देय राहील.

निलंबन कालावधीत पाटील यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १६ मधील तरतूदीनुसार, खाजगी नोकरी स्वीकारता येणार नाही अथवा कोणताही व्यवसाय करता येणार नाही. पाटील यांनी खाजगी नोकरी स्वीकारली अथवा काही व्यवसाय केला तर गैरवर्तणूकीबाबत त्यांना दोषी समजण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांचेविरुध्द कारवाई करण्यास ते पात्र होतील अशा परिस्थितीत निर्वाहभत्ता मिळण्याचा हक्क ते गमावतील.

# खरोखरच मदत करायची असेल तर, लाडकी बहीण योजनेची गरज नाही

**मुंबई :** नॉन स्टॉप पावसाने सर्वत्र हाहाकार माजवला असताना सरकारच्या लाडकी बहीण योजनेसाठी एजंट कडून लुटमार सुरू आहे. सरकारने जर खरोखरच आम्हा लाडक्या बहिणींना आर्थिक मदत करायची असेल तर वीजबिल, विमा योजना, मेडिकल, महागाई, शिक्षण या व इतर मूलभूत गरजा मध्ये सवलत द्यावी, फक्त घोषणा करून एजंटचे, झेरॉक्स दुकानदारांचे, ई महासेवा केंद्रवाल्यांचे खिसे भरण्याचे व भर पावसात घरची सर्व कामे सोडून रांगेत उभे करून आमचा वेळ वाया घालविण्याचे राजकारण करू नये. असे स्पट मत लाडक्या बहिणी लाडक्या भावाकडे करत आहेत.

योजनेची घोषणा केली तेव्हा सुरवातीला विविध प्रकारचे दाखले, पुरावे, बँक पासबुक, रेशनकार्ड, लाईटबिल, निवडणूक ओळखपत्र, रहिवाशी पुरावा, डोमासाईल, आधार कार्ड, योजना वयाची मर्यादा, अपुरा अवधी, फोटो, अशी सर्व कागदपत्रे सादर करण्याचे सांगितले. दोन दिवसांनी काही कागदपत्र कमी केले. मात्र वास्तवात चित्र वेगळे आहे.

अंगणवाडी महिला सविस्तर माहिती देत असताना, ई महासेवा केंद्रात गेले की वेगळी माहिती देण्यात येत होती. टिव्हीवर माहिती वेगळी दिली जाते. वृत्तपत्रात वेगळी माहिती असते, सोशल मीडियावर वेगळी तर नाक्यानाक्यावर वेगळी माहिती मिळत असल्याने अनेक महिला व योजनेसाठी धावपळ करणारे त्यांचे पती, भाऊ इतर नातेवाईक वैतागले आहेत.

काही ठिकाणी लग्न प्रमाणपत्र मागितले जाते तर काही ठिकाणी लग्न प्रमाणपत्र गॅझेट मध्ये नोंद असल्याचे पुरावे मागितले जात आहेत. त्यासाठी दोन ते तीन हजार ई महासेवा केंद्रातील एजंट मागत आहेत. पुरावे अर्जंट हवे असेल तर चार ते पाच हजार मागत आहेत. सरकार सांगते तक्रार करा. तक्रार कुठे आणि कशी करायची ? तक्रार नोंदणी करायला गेल्यावर तिथे लाच मागणार नाहीत याची खात्री सरकारने देणार आहे का ? असा सवाल करत संतप्त झालेली जनता तीव्र प्रतिक्रिया देत भिक नको पण कुत्र आवर असे बोलत आहेत.

अंगणवाडी, आशा सेविका, परिचारक या व इतर विभागातील महिला आंदोलन करत भर पावसात भावाकडे न्याय मागत आंदोलन करत आहेत. उद्या या १५०० रुपयांसाठी आम्हाला आंदोलन करावे लागणार आहे. कारण लोकसभा निवडणुका निकाल पाहून या बहिणीसाठी भाऊ जागा झाला आहे. या आधी बहीण दिसली का नाही ? असा सवाल करत महिला संतप्त झाल्या आहेत.

# भुशी डॅम येथील पर्यटकांवरील बंदी मागे घ्यावी : आमदार सुनिल शेळके



**वडगाव मावळ :** वर्षाविहारासाठी पर्यटकांचे मुख्य आकर्षण असलेल्या भुशी डॅम येथे दोन दिवसांपासून पर्यटकांना लागू करण्यात आलेली प्रवेश बंदी मागे घेण्याबाबत शासनाने जिल्हाधिकारी व रेल्वे खात्याला सूचना द्याव्यात, अशी जोरदार मागणी मावळचे आमदार सुनिल शेळके यांनी आज (मंगळवारी) विधानसभेत केली.

लोणावळ्याच्या भुशी डॅम परिसरात घडलेल्या दुर्घटनेनंतर जिल्हाधिकारी व रेल्वे खात्याने केलेल्या कारवाईचे तीव्र पडसाद विधानसभेतही उमटले. या कारवाईच्या विरोधात आमदार शेळके यांनी आवाज उठवला.

आमदार शेळके म्हणाले की, भुशी डॅमपासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या धबधब्यात वाहून गेल्यामुळे पाच जणांना मृत्यू झाला ही घटना दुर्दैवी होती.

या दुर्घटनेनंतर जागेची कोणतीही शहानिशा न करता दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या भुशी डॅम येथील विक्रेत्यांच्या टपऱ्या व दुकानांवर जिल्हाधिकारी व रेल्वे प्रशासनाने केलेली कारवाई अन्यायकारक होती. त्यानंतर दोन दिवसांपासून या ठिकाणी पर्यटकांना करण्यात आलेली प्रवेश बंदी चुकीची असून ती त्वरित मागे घेण्याबाबत शासनाने संबंधितांना सूचना कराव्यात.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# SIT च्या अहवालानंतर योगी आदित्यनाथ ॲक्शन मोडवर

## सहा अधिकारी निलंबित



**उत्तर प्रदेश :** हाथरस येथे स्वयंघोषित धर्मगुरू भोले बाबाच्या सत्संगात झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर देशभरातून या सत्संगाचं आयोजन करणारे लोक आणि भोले बाबाविरोधात संतापाची लाट उसळली. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत एसआयटी चौकशी करण्याचे आदेश दिले होते. एसयाटीच्या पथकाने तीन दिवसांचा तपास आणि तब्बल १२० हून अधिक लोकांच्या चौकशा केल्यानंतर एसआयटीने ३०० पानांचा अहवाल सादर केला आहे. या अहवालात दुर्घटनेची कारणं आणि दुर्घटनेला जबाबदार असलेल्या लोकांची नावं नमूद करण्यात आली आहेत. हा अहवाल हाती पडताच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ॲक्शन मोडवर आहेत. उत्तर प्रदेश सरकारने उपविभागीय दंडाधिकाऱ्यांसह सहा अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. सर्कल ऑफिसरसह, सिकंदरामाऊच्या तहसीलदारांचाही या निलंबित अधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे.

२ जुलै रोजी नारायण साकार उर्फ विश्व हरी उर्फ भोले बाबा या स्वयंघोषित धर्मगुरूने आणि त्याच्या अनुयायांनी हाथरस येथे सत्संगाचं आयोजन केलं होतं. स्वतः भोले बाबाने या सत्संगाच्या कार्यक्रमात प्रवचन दिलं. मात्र प्रवचन संपवून तो तिथून निघून जात असताना सत्संगाला आलेल्या भक्तांनी त्याला नमस्कार करण्यासाठी त्याच्या कारच्या दिशेने धाव घेतली. हजारो लोक एकाच वेळी त्याच्या कारच्या दिशेने धावू लागले आणि त्याच वेळी धक्काबुक्की आणि चेंगराचेंगरी झाली. यात १२१ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांची संख्या अधिक होती.

दरम्यान, हाथरस चेंगराचेंगरी प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयाच्या पटलावर गेलं असून सर्वोच्च न्यायालयात यावर सुनावणी होणार आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली असून न्यायालयाने ही याचिका स्वीकारली आहे.

**एसआयटीच्या अहवालात काय म्हटलंय?**

या प्रकरणाचा तपास करून एसआयटीने अहवाल सादर केला आहे. ज्यामध्ये म्हटलं आहे की सत्संगाचं आयोजन करणाऱ्या समितीच्या बेजबाबदारपणामुळे ही दुर्घटना घडली आहे.

या अहवालातून एसआयटीने प्रशासनाच्या कारभारावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. या सत्संगाला २ लाखांहून अधिक लोक जमले होते. परंतु, आयोजकांनी केवळ ८०,००० लोकांसाठी परवानगी मागितली होती. तसेच स्थानिक अधिकाऱ्यांनी त्यांच्या वरिष्ठांना ८०,००० लोकांसाठी परवानगी देत असल्याची माहिती दिली होती. त्यामुळे आयोजक आणि प्रशासकीय अधिकारी अडचणीत सापडले आहेत. दरम्यान, या ३०० पानी अहवालात भोले बाबाचा नामोल्लेखही नसल्यामुळे आश्चर्य व्यक्त केलं जात आहे.

# अन्यथा क्रिकेटच्या देवाचा पुतळा तोडणार !



**मुंबई :** भारतरत्न मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचा

छत्तीसगड मधील देवगहान - गुंडेरदेही येथे ५ एकर जागेमध्ये स्व:खर्चाने मी पुतळा बसवला आहे. या ठिकाणी कारगील व चीन मधील गलवान घाटी युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांची छायाचित्रे लावली आहेत. या क्रीडांगणचे येत्या १५ आगस्ट रोजी भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते उदघाटन करण्याचा मानस आहे. सचिन यांच्या कार्यालयासोबत पत्रव्यवहार देखील केला आहे .मात्र त्यांच्या कार्यालयाकडून अद्याप कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. जर सचिन तेंडुलकर या उदघाटनाला आले नाही तर त्यांचा तो पुतळा तोडून त्यांच्या जागी शहीद भगतसिंग व चंद्रशेखर आझाद यांचा पुतळा उभारण्यात येईल असा इशारा देवगहान - गुंडेरदेही चे माजी सरपंच लोकेंद्र साहू यांनी मंगळवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

'बेटी बचाव बेटी पडाव' हा संदेश पाहून साहू यांनी दोन मुलींवर कुटुंब नियोजन करण्याचा निर्णय घेतला. लहान मुलगी तान्या हिच्या जन्माचे औचित्य साधून त्यांनी दोन वर्षांपूर्वी सचिन तेंडुलकर यांचा १२ लाख रुपये खर्चून स्वतःच्या शेतात गार्डन बनवून पुतळा बसविला. साहू हे एक क्रिकेट खेळाडू आहे .भारतीय क्रिकेट संघात खेळण्याचे स्वप्न उराशी बाळगून ते शिक्षण सोडून २००१ - ०२ मध्ये मुंबई नॅशनल क्रिकेट क्लब येथे कोचिंग घेण्यासाठी आले होते. परंतु त्यांचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

माझी मुलगी अजूनही सचिन यांची वाट पाहत आहे. ती दररोज सचिनच्या पुतळ्याच्या ठिकाणी जाऊन सचिनला विचारते सचिन सर आमच्या घरी कधी येणार ? रक्षाबंधनाच्या वेळी माझ्या मुली सचिनच्या पुतळ्याच्या मनगटावर राखी बांधतात आणि प्रत्येक सणाला शुभेच्छा देण्यासाठी जातात आणि दरवर्षी २४ एप्रिलला सचिनचा वाढदिवस पुतळ्यासमोर केक कापून साजरा करतात.

येत्या १५ आगस्ट रोजी वीर जवानांचे छायाचित्रांचे उदघाटन करण्यासाठी जर सचिन तेंडुलकर आले नाही तर त्यांचा तो पुतळा तोडून त्यांच्या जागी शहीद भगतसिंग व चंद्रशेखर आझाद यांचा पुतळा उभारण्यात येईल असा इशारा देवगहान - गुंडेरदेही माजी सरपंच लोकेंद्र साहू यांनी पत्रकार परिषदेत दिला.

# दिक्षाभूमी ते चैत्यभूमी शिवशक्ति - भीमशक्ति महायात्रा




**मुंबई :** लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती दिन १ ऑगस्ट २०२४ पासून पीपल्स रिपब्लिकन पार्टी च्या सदस्यता अभियानाला राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे व राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांच्या हस्ते अभियानाची सुरवात करण्यात येणार आहे. १५ ऑगस्ट २०२४ पासून दीक्षाभूमी ते चैत्यभूमी शिवशक्ति - भीमशक्ति आशिर्वाद महायात्रा पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष, सांविधान सन्मान लॉगमार्च प्रणेते, जयदीपभाई कवाडे यांच्या नेतृत्वाखाली निघणार आहे. अशी माहिती मंगळवारी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच लाँगमार्च प्रणेते पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या हस्ते या यात्रेची सुरवात करण्यात येणार आहे.

तसेच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पीपल्स रिपब्लिकन पार्टी महायुतीतून कमीत कमी १० विधानसभा लढवणार तशी मागणी महायुतीतील नेत्यांना केली आहे. अशी माहिती युवक प्रदेश अध्यक्ष सोमनाथ भोसले यांनी यावेळी दिली.

पीपल्स रिपब्लिकन पार्टी शिवसेनेसोबत महायुतीत सहभागी आहे परंतु अजुन पर्यंत पीपल्स रिपब्लिकन पार्टीला सत्तेत कोणताही वाटा मिळाला नाही म्हणून राज्यातील आंबेडकरी रिपब्लिकन जनतेमध्ये असंतोष निर्माण होत आहे . त्यामुळे पीपल्स रिपब्लिकन पार्टीला महायुती सरकार मधे सत्तेत योग्य वाटा मिळावा व रिपब्लिकन चेहरा म्हणुन राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाडे यांना विधान परिषद वर संधी देऊन मंत्रिमंडळात सहभागी करावे अशी मागणी

# जि.प. प्राथमिक शाळा अंबवडे सं.वा. शाळेचा सातारा जिल्ह्यात डंका

**आसनगाव :** सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने सन २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या स्वच्छ सुंदर उपक्रमशील व गुणवत्तापूर्ण शाळा स्पर्धेत कोरेगाव तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या अंबवडे सं.वा. प्राथमिक शाळेने इ.१ ली ते ५ वी च्या प्राथमिक शाळेने सातारा जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला.यात अंबवडे सं वाघोली प्राथमिक शाळेने यश संपादन केले आहे. सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने या स्पर्धेतील विजेत्या शाळेचा गौरव करण्यात येणार आहे. स्वच्छ , सुंदर, उपक्रमशील व गुणवत्तापूर्ण शाळा स्पर्धेत यशस्वी झालेल्या जिल्हा परिषदेच्या अंबवडे सं वाघोली या शाळेत वर्षभर विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शाळेने विविध शासकीय स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे.यामध्ये केंद्र सरकारच्या पी एम श्री योजनेमध्ये तालुक्यातून एकमेव म्हणून या शाळेची निवड करण्यात आली.लोकसहभागातून भौतिक सुविधासह गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.शाळेच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सौ. छाया चव्हाण मॅडम व सहकारी शिक्षकांनमध्ये सौ. सत्वशिला गायकवाड,सौ वर्षा सलगरे,सौ जोत्स्ना फडतरे या शिक्षकांसह सर्व विद्यार्थी तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या यशाबद्दल सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, प्राथमिक शिक्षणाधिकारी शबनम मुजावर, गटविकास अधिकारी सुप्रिया चव्हाण, गटशिक्षणाधिकारी धनंजय चोपडे, भागशिक्षण विस्तार अधिकारी मनिषा चंदुरे, वनिता मोरे मॅडम, केंद्र प्रमुख सर्जे राव धनावडे, सरपंच शुभांगी सकुंडे,उपसरपंच दत्तात्रय लांडगे,सर्व सदस्य,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण सकुंडे, उपाध्यक्ष व सर्व सदस्य तसेच विशेष सहकार्य महेश कोरडे लाभले.

# क्षारपड निर्मूलनासाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे : शरद पवार

## कवठे एकंदच्या क्षारपड प्रश्नी शेतकऱ्यांची साधला संवाद

**तासगाव :** शेतीला पाणी गरजेचे आहे. पण अति होऊनही चालणार नाही. जमिनीचे आरोग्य बिघडते. त्यासाठी अतिरिक्त होणारे पाणी बाहेर काढले पाहिजे. शासन आणि शेतकरी यांनी समन्वयाने क्षारपड निर्मूलनाचा प्रश्न सामूहिक प्रयत्नाने निकाली काढावा. शेतकऱ्यांनी सहकार्याची भूमिका घ्यावी.असे मत माजी कृषिमंत्री शरद पवार यांनी कवठे एकंद येथे बोलताना व्यक्त केले.

कवठे एकंद ता. तासगाव येथील सिद्धराज सहकारी शेती पाणीपुरवठा संस्था यांच्या वतीने आयोजित क्षारपड व पाणथळ जमीन सुधारणा मोहिमेबाबत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी आ. सुमनताई पाटील, डॉ. नरेंद्र खाडे, रोहित पाटील, पाटबंधारे संशोधन विभाग पुणे च्या कार्यकारी अभियंता प्रिया लांजेकर , संजय बजाज आदी उपस्थित होते.

शरद पवार पुढे म्हणाले की ''नदीकाठसह इथल्या जमिनी काळ्या कमी धर असणाऱ्या आहेत. अति पाण्यामुळे त्यांची सुपीकता बिघडली आहे. शेतकऱ्यांनी जमिनीची सुपीकता आणि उत्पन्न याचा ताळमेळ घालताना काळजीने शेती केली पाहिजे. ऊस शेती ही आळशी लोकांची शेती आहे. एकदा ऊस लावला की साखर कारखान्याला पाठवायची वाट बघायची. बाकीचा सगळा वेळ दुनियाभरच्या राजकारणाच्या चर्चा करत बसायचं. हे योग्य नाही तर प्रपंच नेटाने केला पाहिजे. असा सल्ला त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

कवठे एकंद येथील क्षारपड जमीन निर्मूलनासाठी शासकीय योजनेतून लाभ द्यावा अशा मागणीचे निवेदन सिद्धराज पाणीपुरवठा संस्था सर्व शेतकरी सभासद यांच्या मा. शरद पवार व आमदार सुमंत पाटील यांना वतीने देण्यात आले.

यावेळी कार्यकारी अभियंता प्रिया लांझेकर बोलताना म्हणाल्या की काळ्या जमिनींना पुरेसा निचरा नसल्यामुळे आणि शेतीला जास्त पाणी वापरल्यामुळे जमीन पातळ होऊन खराब होते. यामुळे पाण्याचा काटकसरीने व ठिबक सिंचन सारख्या पद्धतीने वापर केला पाहिजे. पाणी देणे हे जबाबदारी जलसंपदा विभागाची आहेच मात्र पाण्यामुळे क्षारपट व नापीक झालेल्या जमीन सुधारण्यासाठी शेतकऱ्यांनीच पुढाकार घेतला पाहिजे. क्षारपड सुधारण्यासाठी ८०% शासन निधी तर १०% संबंधित शेतकरी तसेच १०% परिसरातील साखर कारखाना उद्योग असे प्रयोजन शासनाचे आहे. या योजनेचा लाभ घेऊन खराब होणारी जमीन क्षारपड मुक्त करण्यासाठी सहभाग दर्शवावा. असे त्यांनी सांगितले.

# राज्य कामगार विमा योजना अजून अडचण , नसून खोळंबा

**मुंबई :** मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे, अकुशल कामगार, बांधकाम कामगार, सुरक्षा रक्षक, असे आर्थिक मागास वर्गातील कामगार यांना सरकारने ( ई एस आय सी ) राज्य कामगार विमा योजने मार्फत आरोग्य सेवा देण्यासाठी राज्यभर जी आरोग्य यंत्रणा कार्यरत ठेवलेल्या यंत्रणेची अवस्था असून अडचण व नसून खोळंबा अशी असल्याने या कामगारांना आरोग्य सुविधे अभावी खाजगी रुग्णालयाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे सरकारने अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या योजनेचा आम्ही केलेल्या मागण्यांचा आढावा घ्यावा व कामगारांना न्याय द्यावा अशी मागणी आर्थिक मागास कामगार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या कामगार योजनेची विभागीय आरोग्य केंद्र संख्या अपुरी असल्याने कामगारांचा प्रवास खर्च वाढत आहे. जे कामगार तीन शिफ्ट मध्ये नोकरी करत आहेत त्यांना या लांब असलेल्या आरोग्य केंद्रावर जाण्यासाठी प्रवासामुळे कामाचे खाडे करावे लागते. तसेच प्रवासाचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. कामाचे खाडे व प्रवास खर्च याचा हिशोब केला तर घराजवळील खाजगी डॉक्टरकडे उपचार घेऊन कामावर जाता येते. त्यामुळे विभागीय आरोग्य केंद्राची अपुरी संख्या वाढवावी अशी मागणी सरकारकडे केली आहे.

कामाचे खाडे करून प्रवास खर्च भुर्दंड सोसून जर लांब असलेल्या आरोग्य केंद्रावर गेले तर डॉक्टर उपलब्ध नसतात. औषध उपलध नसल्याने बाहेरून खाजगी मेडिकल मधून औषधे घेण्यास सांगितले जाते. मात्र खाजगी मेडिकल चे बिल परतावा देण्यास वर्षभर हेलपाटे घालावे लागतात. बिल परताव्याची रक्कम व हेलपाटे घालावे लागताना होणारा प्रवास खर्च व कामाचे खाडे यांचा हिशोब केला तर बिल परताव्याची रक्कम कमी व हेलपाटे प्रवास खर्च जास्त होतो. त्यामुळे भिक नको पण कुत्र आवर अशी अवस्था कामगाराची होते.

या आरोग्य केंद्रात डॉक्टरकडून मिळणारी वागणूक म्हणजे कामगारांवर उपकार केल्याचे भाव डॉक्टर च्या चेहऱ्यावर असतात. कामगार पेशंट ला तपासणे हा एक प्रकार असतो तो प्रकार डॉक्टर विसरलेले असतात. काय होतय..असे विचारताना पेशंटच्या चेहऱ्याकडे न पाहणारे डॉक्टर हे देवाचे दुसरे रूप आहेत की यम अवतार आहेत असे वागतात. शिपाई , पैसे भरण्याच्या खिडकिवरील क्लार्क, सुरक्षा रक्षक, कंपाऊंडर सर्वजण उपकार केले असल्या सारखे वागत असतात. त्यामुळे सरकारने या सर्व प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे अशी मागणी केली आहे.

# काँग्रेस कमिटीच्यावतीने पाटणचे प्रांताधिकारी सुनिल गाढे यांना निवेदन



**पाटण :** पाटण ते कोयनानगर दरम्यानच्या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे याची तात्काळ दुरुस्ती करावी तसेच पाटण ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना सर्व सुविधा मिळाव्यात व पाटण नगरपंचायत मध्ये कायम स्वरूपी मुख्याधिकारी यांची नेमणूक व्हावी अशी मागणीचे निवेदन पाटण तालूका काँग्रेस कमिटीच्या वतीने पाटणचे प्रांताधिकारी सुनिल गाढे यांना देण्यात आले आहे.

यावेळी सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस नरेश देसाई पाटण तालुका सरचिटणीस ॲड. राजन भिसे, पाटण शहराध्यक्ष दर्शन कवर, अनुसूचित जाती सेलचे तालुकाध्यक्ष आनंदा कांबळे, जिल्हा सदस्य हमीदबाई मुकादम, जेष्ठ कार्यकर्ते माधव माने, विठ्ठल बाबर यांची प्रमुख उपस्थिती होती.

निवेदनात म्हटले आहे की पाटण ते कोयनानगर या रस्त्यावर वाहनांची सतत वर्दळ असुन य चाल सदरचा रस्ता पावसामुळे खराब होऊन रस्त्यामध्ये मोठे मोठे खड्डे पडलेले आहेत त्यामुळे वाहतूक करणे अशक्य झाले आहे व वाहनांचे प्रचंड नुकसान होत आहे त्यामुळे सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे पाटण नगरपंचायत मध्ये कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहेत, सदर ठिकाणी मुख्याधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी, तसेच पाटण ग्रामीण रुग्णालयामध्ये पाटण तालुक्यातून विविध भागातून लोक उपचारासाठी येत असतात परंतु त्यांचेवर उपचार करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसतात तसेच अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे,याठिकाणी आवश्यक सोयी उपलब्ध करून जनतेची होणारी गैरसोय दूर करावी असे म्हटले आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी सातारा तहसीलदार पाटण उपअभियंता पाटण आयुक्त नगर प्रशासन विभाग सातारा यांना देण्यात आलेल्या आहेत.

# महात्मा बाब यांचा शहीद स्मृती दिन संपन्न



**मुंबई :** संपूर्ण जगभरातील बहाई अनुयायी मंगळवारी ९ जुलै रोजी त्यांच्या धर्मश्रद्धेचे अग्रदूत महात्मा बाब (अर्थात 'द्वार') यांचा शहीद स्मृती दिन पाळण्यात आला. यावेळी बहाई सोसायटी सचिव नर्गिस गौर , शुभांकित पानीग्रही, झिया इशराघी हे उपस्थित होते.

शिराझ, इराण येथे जन्मलेल्या महात्मा बाब १८५० मध्ये ९ जुलै रोजी दुपारी १२ वाजता बटालियनच्या ७५० सैनिकांनी दु:खदपणे गोळ्या झाडल्या तेव्हा शेवटपर्यंत धैर्याने त्याच्या विश्वासासाठी उभे राहिले.

महात्मा बाब यांनी जाहीर केले होते की त्यांच्या अवतारकार्याचा हेतू सर्वधर्माचे प्रतीक्षित युगावतार, दैवी शिक्षक बहाउल्लाह यांच्या अवतरणासाठी मार्ग तयार करणे हा होय, जे यापूर्वीच्या सर्व धर्माच्या भविष्यवानींची पूर्तता करण्यास अवतरीत होणार आहेत आणि संपूर्ण मानवजातीला एकतेमध्ये प्रतिष्ठित करणार आहेत.

महात्मा बाब यांनी स्वतः घोषित केल्याप्रमाणे, मीच मूळ बिंदू आहे ज्यातून सर्व निर्माण झालेल्या गोष्टी निर्माण झाल्या आहेत. त्याचा चिरस्थायी वारसा आशा आणि परिवर्तनाचा दिवा म्हणून काम करतो, व्यक्तींना प्रेम, एकता आणि करुणा या तत्त्वांचा स्वीकार करण्याचे आवाहन करतो, शेवटी सर्वांसाठी उज्वल भविष्याचा मार्ग मोकळा करतो.

# राज्यपालांच्या उपस्थितीत पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा वर्धापन दिन साजरा




**मुंबई** : शिक्षणा शिवाय सामाजिक क्रांति घडू शकत नाही.गोरगरीब दलित बहुजन समाजातील मुलांनी शिक्षण उच्च शिक्षण घेऊन सामजिक परिवर्तन व्हावे; दलित बहुजनांच्या सामाजिक उत्थानासाठी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी ची स्थापना केली. या ऐतिहासिक ठरलेल्या शिक्षणांस्थेच्या अडचणी सोडविण्यासाठी राज्यपालांनी लक्ष द्यावे असे जाहीर आवाहन पीपल्स एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांनी केले. पीपल्स एज्युकेशन सोसायटी चा आज ७९ वां वर्धापन दिन सोहळा मुंबईत यशवंत चव्हाण सेंटर येथे ना.रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेत आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम मा रमेश बैस उपस्थित होते.यावेळी राज्यपालांच्या आणि ना.रामदास आठवले यांच्या हस्ते विविध मान्यवरांना डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने गौरवण्यात आले.

महामानव क्रांतीसुर्य डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या संविधनामुळे देश एकसंघ अभेद्य आहे.देश कोणी तोडू शकत नाही.कोणतीही शक्ती संविधान बदलू शकत नाही.महामानव डॉ.बाबसाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेला बुद्धिझम हा मानवतावादी; विज्ञानवादी समतावादी आहे.भारत देशाची आर्थिक सामाजिक सर्व क्षेत्रात पायाभरणी करण्याचे काम महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी केलेले आहे असे ना.रामदास आठवले म्हणाले.त्यासाठी त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या दामोदर व्हॅली प्रकल्पाचे उदाहरण यावेळी सांगितले.

दरम्यान या कार्यक्रमास महाराष्ट्राचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते मात्र ते या कार्यक्रमाला न येता गुजरात ला गेल्याचे कळविण्यात आले.ही बाब समोर आल्यानंतर ना.रामदास आठवलेंनी स्टेजवरच चंद्रकांतदादांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.आम्ही सरकार सोबत आहोत .युती मध्ये आहोत. मात्र आम्हाला न्याय दिला जात नाही.डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संस्थेच्या कार्यक्रमात उपस्थित राहण्याऐवजी अन्य कोणता मोठा कार्यक्रम होता असा सवाल ना.रामदास आठवलेंनी केला.

पीपल्स एज्युकेशन सोसायटी मध्ये अनेक वर्ष वाद आहेत .याबाबत धर्मादाय आयुक्तांनी दोन वेळा निकाल देऊन पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे रामदास आठवले हे अधिकृत अध्यक्ष आणि त्यांच्या अध्यक्षते तील कार्यकारिणी अधिकृत असल्याचा निकाल दिला आहे.त्यानुसार विद्यापीठाने कारवाई केली पाहिजे.मात्र धर्मदाय आयुक्तांचा निकाल असून कोणतीही अंमलबजावणी विद्यापीठाने याबाबत केली नाही.यासाठी उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतादादा पाटील यांच्या कडे अनेक बैठका झाल्या मात्र निर्णय घेऊन अंमलबजाणी झाली नाही. माझ्या अध्यक्षते तील कमिटी अधिकृत असून न्यायाची बाजू असून आमच्यावर अन्याय केला जात आहे.सरकार मध्ये आमचा पक्ष असला तरी आम्हाला न्याय दिला जात नाही. आमची बाजू न्यायाची असून आम्हाला न्याय दिला जात नाही .मी अन्याय सहन करणारा नाही. मी अन्यायाविरुद्ध संघर्ष करीत इथपर्यंत पोहोचलो आहे.मी जर संघर्ष सुरू केला तर सर्व काम बिघडेल असा इशारा ना.रामदास आठवलेंनी यावेळी दिला .

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे न्यायाची भूमिका घेऊन देशाच्या विकासासाठी पुढे चालले आहेत.आमचा त्यांना पाठिंबा आहे.त्यामुळे महामहीम राज्यपाल महोदयांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी कडे लक्ष देऊन न्याय द्यावा असे आवाहन ना.रामदास आठवलेंनी यावेळी केले

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै १९४५ साली स्थापन केलेली पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही देशातील एक अग्रणी शैक्षणिक संस्था असून गेल्या ८ दशकांमध्ये, सोसायटीने सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय लोकांच्या अनेक पिढ्यांना शिक्षित व स्वावलंबी केले आहे. आज संस्था विविध अडचणींना तोंड देत आहे. या समस्या सोडविण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन यावेळी महामहीम राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे दिले.

यावेळी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ सुखदेव थोरात, सोसायटीचे विश्वस्त पद्मश्री उज्वल निकम, एडव्होकेट बी.के. बर्वे, सचिव डॉ वामन आचार्य, सहसचिव डॉ यु एम मस्के, कार्यकारी समिती सदस्य चंद्रशेखर कांबळे आदी उपस्थित होते.

ज्यांनी जोखीम पत्करली, महासागरांवर वर्चस्व निर्माण केले आणि उद्योजक आणि व्यवसाय करण्यासाठी देश आणि खंड पार केले, त्यांनी जगावर राज्य केले. भारत अनेक शतकांपासून सागरी राष्ट्र होते. जगातील अनेक दूरवरच्या देशांशी भारताचे व्यापारी संबंध होते. देशाला त्याचे गतवैभव परत मिळवून देण्यासाठी शिक्षण, उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, कौशल्य शिक्षण आणि उद्यमशीलतेला प्राधान्य द्यावे लागेल, असे राज्यपालांनी सांगितले.





क्षेत्र महाबळेश्वर येथील निसर्ग सौंदर्य खुलले असून सर्वत्र दाट धुक्याची चादर पहावयास मिळत आहे.दुसर्या छायाचित्रात पर्यटकांची गर्दी पहावयास मिळत आहे
- ( छाया;शुभम गुरव)

# क्षेत्र महाबळेश्वरचे सौंदर्य खुलले

## हुडहुडीतही पर्यटकांची गर्दी,सर्वत्र दाट धुक्याची चादर

**- शुभम गुरव,**

**क्षेत्र महाबळेश्वर** : महाबळेश्वरपासून ७ किमीच्या अंतरावर असलेल्या श्री क्षेत्र महाबळेश्वरचे निसर्गसौंदर्य खुलले असून सर्वत्र दाट धुक्याची चादर पहायला मिळत आहे.क्षेत्र महाबळेश्वर हे ऐतिहासिक वारसा लाभलेले ठिकाण असून येथे विविध प्रेक्षणीय ठिकाणे व प्राचीन मंदिरे आहेत.पावसामुळे परीसरातील निसर्गसौंदर्य खुलले असून सर्वत्र दाट धुक्याची चादर पहायला मिळत आहे. येथील छोटे-मोठे धबधबे व दाट धुक्याची चादर पर्यटकांचे खास आकर्षण ठरत आहेत.शनिवार-रविवार व सुट्ट्यांच्या दिवशी क्षेत्र महाबळेश्वर पर्यटकांनी गजबजून जात असून पर्यटक निसर्गाचा मनमुराद आस्वाद घेताना दिसत आहेत. प्रसिद्ध व प्राचीन मंदिरे असलेली महाबळेश्वर मंदिर, पंचगंगा मंदिर,कृष्णाई मंदिरात भाविक व पर्यटक आवर्जून भेट देताना दिसत आहेत.तसेच येथून जवळपास असणार्या पॉईंट्स परीसरात पर्यटक निसर्गाचा मनमुराद आनंद लुटताना दिसत आहेत.पावसाळ्यातील निसर्गाचा अद्भुत नजराणा पर्यटक आपल्या कॅमेऱ्यात टिपत आहेत.पावसाळ्यात असमारे निसर्गाचे सौंदर्य तसेच दाट धुक्याची दुलई हुडहुडी भरणारी थंडी आणि डोंगररांगामधून वाहणारे छोटे-मोठे धबधबे हे सर्व निसर्गसौंदर्य पाहून पर्यटकांच्या मनाला सुखद अनुभव देत आहेत.पर्यटक आपल्या कुटुंबासोबत येथील निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेत आहेत तसेच पर्यटक गरमा गरम मकई कणीस,स्वीट कॉर्न,वडापाव यावर ताव मारताना दिसत आहेत.दरवर्षी लाखो पर्यटक या ऐतिहासिक ठिकाणाला भेट देत असतात व येथील पर्यटनाचा आनंद लुटत असतात.

> **छोटे मोठे धबधबे, परीसरातील मंदिरे,पॉंइट पर्यटकांचे खास आकर्षण**
>
> परीसरातील छोटे मोठे धबधबे आणि परीसरातील ऐतिहासिक व प्राचीन असलेली मंदिरे तसेच पॉंइट परीसर पर्यटकांचे खास आकर्षण दिसत असून या निसर्गसौंदर्याचा आपला कुटुंबासोबत आनंद लुटताना पर्यटक दिसत आहेत.

# सातारा जिल्ह्यातील धबधबे, धोकादायक ठिकाणी पर्यटकांच्या प्रवेश बंदीबाबत पालकमंत्री देसाईंच्या महत्वाच्या सूचना



**सातारा** : सातारा जिल्ह्याच्या काही भागात चांगला पाऊस सुरू आहे. पावसाळी पर्यटनासाठी नागरिक मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी धबधबे, जलाशयासारख्या धोकादायक ठिकाणी ग्रामपंचायतींनी प्रवेश बंदीचे फलक लावावेत. सडावाघापूरसह इतर ठिकाणीही पोलिसांनी गस्त वाढवून हुल्लडबाजांवर कारवाई करावी, अशी स्पष्ट सूचना पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केली आहे.

पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी अतिवृष्टीतील उपायोजनांबाबत दूरदृश्यप्रणालीद्वारे नुकतीच आढावा बैठक घेतली. यावेळी बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलिस अधीक्षक समीर शेख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे यांच्यासह सर्व प्रांताधिकारी, गटविकास अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पालकमंत्री देसाई यांनी पावसाच्या काळात आवश्यक त्या ठिकाणी गरजेनुसार नागरिकांचे स्थलांतर करावे लागल्यास यंत्रणांनी सुरक्षित निवारे, पुरेसे अन्नधान्य, औषधसाठा याची तजबीज ठेवावी, अशी सूचना केली, तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे जिल्ह्यात चांगल्या प्रकारे काम सुरू आहे. घरोघरी जाऊन पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचा सातारा जिल्ह्याचा पॅटर्न अनेक जिल्ह्यांनी स्वीकारला आहे. या योजनेचे काम गतीने होण्यासाठी सर्व प्रांताधिकाऱ्यांनी समन्वय ठेवावा. शासनाने जारी केलेले अर्ज भरून घेण्यात यावेत, असेही स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी डुडी यांनी पावसामुळे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. औषध व धान्याचा पुरेसा पुरवठा झालेला आहे. अतिवृष्टीमुळे स्थलांतराची वेळ आल्यास त्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे स्पष्ट केले, तसेच त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन दररोज घेत आहेत. येत्या २१ दिवसांत जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांची नोंदणी पूर्ण केली जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# जिल्ह्यात आपत्ती उपाययोजनांसाठी १६२ कामांचा ४८२ कोटींचा आराखड्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर

**सातारा** : सातारा जिल्ह्यातील आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत १६२ कामांचा समावेश असलेला ४८२ कोटींचा प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात आला आहे. भारतीय सर्वेक्षण खात्याने केलेल्या पाहणीनंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय यंत्रणांनी दरड व भूस्खलन प्रतिबंधात्मक उपाययोजना, पूरप्रवण क्षेत्रात संरक्षक भिंती आदि कामांचा आराखडा तयार केला आहे.

जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भाग डोंगराळ व अतिपर्जन्याचा असून त्याचा भूकंपप्रवण क्षेत्रात समावेश आहे. जुलै २०२१ मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे महाबळेश्वर, वाई, जावली व पाटण तालुक्यातील ५ गावांमध्ये भूस्खलन होऊन जिवित व वित्तहानी झाली होती. त्यानुषंगाने जिऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, पुणे (जीएसआप) या संस्थेच्यावतीने भूस्खलन व दरडप्रवण भागाचा सर्वे करण्यात आला.

त्या भागात उपाययोजना करण्यासंदर्भात या संस्थेने जिल्हाधिकारी कार्यालयाला अहवाल सादर केला. त्यानुषंगाने दरडप्रवण व भूस्खलन प्रवण क्षेत्रात पूर संरक्षण भिंत बांधकाम, दरड संरक्षण भिंत, एलटी व एचटी लाईन भूमिगत वाहिनी करणे, ड्रेनेजचे बांधकाम करणे, पोचमार्ग सुधारणा करणे, लहन पूल, गटारे व अंतर्गत रस्ता बांधकाम, नारला रुंदीकरण व खोलीकरण तसेच बंधारे दुरुस्ती करणे इत्यादी आपती सौम्यीकरण अंतर्गत उपाययोजना मुचवण्यात आल्या

जिल्ह्यातील आपत्ती सौम्यीकरणांतर्गत १८२ प्रस्तावांच्या संरचनात्मक कामांना व २ असंरचानात्मक कामांना प्रशासकीय मंजुरी व आवश्यक ४१० कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात आला. मात्र २० प्रस्ताव निकषात बसत नसल्यामुळे ते अपात्र ठरवण्यात आले होते. त्यानंतर सुधारित आराखडा तयार करण्यात आला. संरक्षण भिंत बांधणे भेगा बुजवणे, डोंगरावरील धोकादायक दरडी व दगड हटवणे, नदी किंवा ओढ्यांच्या पाण्याचा प्रवाह सुरळीत करणे अशी कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली.

# BJP आमदाराच्या कोरोना काळातील घोटाळ्याचा उल्लेख करत जयंत पाटलांनी केले विधानसभेत थेट आरोप



**सातारा** : आज विधानसभेत सातारा जिल्ह्यातील महत्वाच्या घोटाळ्यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर चांगलाच निशाणा साधला. गुजरातच्या जीएसटी अधिकाऱ्याच्या झाडानीतील घोटाळ्यावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी निशाणा साधल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आरोग्य विभागाचे धक्कादायक प्रकरण बाहेर काढले. भाजपच्या एका आमदाराने कोरोना महामारीच्या काळामध्ये मृत झालेल्या व्यक्तींना जीवंत दाखवून शासनाच्या सवलतींमधून पैसे काढल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला.

जयंत पाटील यांनी सभागृहात आक्रमक पावित्रा घेत नेमकं काय प्रकरण घडलं आहे? याबाबत सविस्तर मांडणी करीत आरोप केले. यावेळी पाटील म्हणाले की, कोरोना काळात एका हॉस्पिटलने मृत रुग्णांना जीवंत दाखवून शासनाच्या सवलतींचा लाभ घेत त्या सवलतीची पैसे खाल्ले आहेत. यात धक्कादायक बाब ही आहे या प्रकरणात मुख्य आरोपी हे आपल्या सभागृहाचे एक सदस्य असून ते सत्तेत महत्त्वाची पदे भूषवणाऱ्या व्यक्तींचे निकटवर्तीय मानले जातात.

सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील मौजे मायणी येथे श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर या संस्थेच्या अंतर्गत इन्स्टिट्यूट ऑफ द मेडिकल सायन्स अँड रिसर्च सेंटर या नावाने वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आहे. २०२० मध्ये देशभरात कोरोना रोगाचा संसर्ग व फैलाव झाला होता. कोरोना रुग्णांवर उपचार करताना या रुग्णालयाचे तत्कालीन अध्यक्ष, सचिव, खजिनदार व इतरांनी महात्मा ज्योतिबा फुले योजनेमध्ये स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी अनेक मयत लोकांना जिवंत दाखवून त्यांच्यावर उपचार केल्याचे आढळून आले.

दरम्यान, याआधी या रुग्णालयाने महात्मा फुले जनआरोग्य योजनेसाठी करारनामा करताना बोगस डॉक्टर दाखवले. यातील डॉक्टर नमुद काळात सदर रुग्णालयात कार्यरत नव्हते व त्यांनी कोणत्याही रुग्णांवर कोणत्याही प्रकारचे उपचार केलेले नाहीत. रुग्णालयाच्या बॉडीने स्वतःच्या फायद्यासाठी सदर डॉक्टर्स रुग्णालयात उपचारासाठी नसतानाही डॉक्टरांची नावे दाखवली. तसेच सातारा जिल्हा परिषद यांच्याकडे रुग्णालय नुतनीकरणासाठी संस्थेच्या संचालक मंडळाचा कोणताही ठराव न घेता, खोटी कागदपत्रे दाखवून, बोगस डॉक्टर दाखवून ३०० बेडचे रुग्णालय नुतनीकरण करून सदर नुतनीकरण प्रमाणपत्र हे महात्मा फुले जनआरोग्य योजनेशी करार करताना जोडून शासनाची व संस्थेची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली.

सदर रूग्णालयामध्ये कोरोना काळात उपचारादरम्यान २०० ते २५० रूग्णांचा मृत्यु झाला होता. या मृत रुग्णांना सुमारे १० दिवस ते ३ महिन्यानंतर जीवंत आहेत, असे दाखवून महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये १० ते १२ दिवस उपचार दिला, असे दाखविले. सदर मृत रूग्णास डिस्चार्ज देताना रूग्ण व्यवस्थित असल्याचे दाखवून मयत झालेल्या रूग्णांच्या डिस्चार्ज फॉर्मवरती खोट्या सह्या केल्या आहेत. मयत रुग्ण रुग्णालयात ॲडमिट झाले, मयत रुग्णांनी हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले, शासकीय सवलतींचा लाभ घेतला.

तर इतकेच नव्हे, महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेच्या नियमानुसार रूग्णाचे समाधान पत्र घेतले जाते ते देखील भरुन दिले. त्यानंतर राज्य परिवहन नियमानुसार परतीचा प्रवास खर्च पन्नास रूपये याचा देखील लाभ घेतला. रुग्णालयाच्या संस्था चालकांनी नुसतीच मयत रुग्णांचे नावे पैसे उकळून शासनाची फसवणूक केली नाही, तर रुग्णांना मिळणारे प्रवासाचे ५० रुपये देखील सोडले नाहीत, असा आरोप जयंत पाटील यांनी केला.

# सातार्‍यात थोरल्या पवार काकांनी धाकट्या पुतण्यावर साधला निशाणा

**सातारा** : राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा तथा संस्थापक शरद पवार हे आज सातारा दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी सातारा येथील रयत शिक्षण संस्थेला भेट दिली. यावेळी कार्यक्रमानंतर पवारांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी शरद पवारांनी अजित पवार यांना लाडकी भिन योजनेवरील तोलेही लगावला. राज्य सरकारने जाहीर केलेल्या लाकडी बहीण योजनेचं स्वागत आहे. कुठल्या का होईना बहिणींना द्यावा, असा टोला शरद पवार यांनी लगावला. तसेच माझ्या संपर्कात कोणीही नाही, मी त्याच्यात लक्षही देत नाही. पण, जयंत पाटील यांना ते लोकं भेटतात याची माहिती मला आहे. त्याच्यावर आऊटकम काय येईल हे उद्याचं मतदान झाल्यावर कळेल, असा गौप्यस्फोट देखील शरद पवार यांनी केला.

सातारा येथील पत्रकार परिषदेतून शरद पवार यांनी एकाचवेळी अनेक विषयावर महत्वाची विधाने केली. यावेळी पवार म्हणाले की, राज्य सरकारने योजना जाहीर केल्या, पण माझा अनुभव आहे की अंदाजपत्रक मांडल्यानंतर ६ महिन्यांनी पुरवणी मागण्या मांडल्या जातात. पण, इथं केवळ ८ दिवसात पुरवण्या मागण्या मांडल्या आहेत. शासनाकडे असलेला निधी आणि घोषित केलेल्या योजना यात खूप अंतर दिसतं. मुलींच्या मोफत शिक्षणाचा निर्णय चांगला आहे, पण संपूर्ण राज्यात ही योजना पार पाडता येईल का? असा सवाल पवार यांनी उपस्थित केला आहे.

# लंडनच्या म्युझियममधील छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखांचं सातार्‍यात ‘या’ दिवशी होणार आगमन

**सातारा** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वाघनखांच्या स्वागतासाठी जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात वाघनखं ठेवण्यासाठी स्वतंत्र कक्ष व सुरक्षेच्या उपाययोजना केल्या आहेत. येत्या १९ जुलैला वाघनखांचे सातार्‍यात आगमन होणार असल्याची चर्चा सध्या सुरू आहे.

वाघनखांच्या स्वागतासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार तसेच पालकमंत्री शंभूराज देसाई, खासदार उदयनराजे भोसले, माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, पृथ्वीराज चव्हाण, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, मकरंद पाटील, जयकुमार गोरे, दीपक चव्हाण, महेश शिंदे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलिस अधीक्षक समीर शेख, तसेच अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

लंडनच्या व्हिक्टोरिया एंड अल्बर्ट म्युझियममध्ये असणारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वापरातील वाघनखं राज्य सरकार भारतात आणत आहे. यासाठी ब्रिटन सरकार आणि राज्य सरकार यांच्यात तीन वर्षांचा करार झाला असून, त्यापोटी राज्य सरकार ब्रिटन सरकारला भाडे देणार आहे. ही वाघनखे येत्या १९ जुलैला सातार्‍यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या संग्रहालयात ठेवण्यात येणार आहेत.